## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ३१/०७/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **ऑगस्ट महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, बुधवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१३ रोजी दुपारी २.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

२. नमुंमपाच्या क्षेत्रातील नेरुळ सेक्टर-१५ येथील माताबाल संगोपन केंद्राच्या मोकळया जागेत १०० खाटांचे सार्वजनिक रुग्णालय बांधणे.

३. नमुंमपाच्या बेलापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भुखंडावर माता बाल संगोपन केंद्र बांधणे.

४. नमुंमपाच्या क्षेत्रातील ऐरोली सेक्टर-३ येथील माताबाल संगोपन केंद्राच्या मोकळया जागेत १०० खाटांचे सार्वजनिक रुग्णालय बांधणे.

५. नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावित सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व माता बाल रुग्णालय बेलापूर करीता वैद्यकीय उपकरणे मध्यवर्ती रुग्णालयीन सेवा उपकरणे, हॉस्पीटल व ऑफीस फर्निचर खरेदी करणे.

६. नमुंमपाच्या वतीने व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्राकरीता प्रवेश शुल्क आकारणे.

७. तळोजा खाडी ते कोपरा गांव अतंर्गत नाल्याच्या पुर्नमार्गात येणारी २०४२ मी.मी.व्यासाची मुख्य जलवाहिनी स्थलांतरीत करणे.

८. सन २०१३-२०१४ च्या अंदाजपत्रकातील योजना विभागाच्या लेखाशिर्षकातील तरतुदीचे पुर्नविनियोजन करणे.

९. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२६ नुसार आयुक्तांनी कर्जाविषयी वार्षिक विवरण पत्र तयार करणे.

१०. नमुंमपा क्षेत्रातील विकास कामांकरिता सुधारित व्याजदराने कर्ज मंजुरी करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**११. श्री. रामआशिष राजबली यादव, यांजकडून :-**

प्र. क्र. ०६, गवतेवाडीच्या समोर पाईप लाईन जवळ पदपथ व गटार बनविणे.

**१२ ते १४. श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**

(१२) नेरुळ नगर आयुक्त बंगला व बालाजी मंदिरा लगतच्या रस्त्यास उडडाणपुल बांधुन जोडणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून आयुक्त बंगला नेरुळ रेल्वे स्टेशन ते बालाजी मंदिराकडे रस्ता जोडण्या करीता उडाणपुल बांधणे. (१३) नमुंमपा सचिवपद श्री. देवकर हे सेवानिवृत्त झाल्यापासून रिक्त आहे. ते अजूनपर्यंत पद रिक्त आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेला कायम स्वरुपी सचिव पद नेमणे गरजेचे आहे. म्हणून तात्काळ जाहिरात देऊन नियमानुसार कार्यवाही करुन सचिव पदी लवकरात लवकर नवीन अधिका-याची नियुक्ती करावी. (१४) नमुंमपामध्ये उद्यान अधिकारी या पदावर कायमस्वरुपी रितसर नेमणूक न केल्या कारणाने सदरच्या पदाची जबाबदारी वेगवेगळया अधिका-यांवर सोपविलेली आहे. (ज्यांनी उद्यान अधिकारी या बाबतची पदवी प्रदान केलेली नाही.) उद्यान विभागाच्या कामाना गती देणे आवश्यक आहे. म्हणून कायम स्वरुपी उद्यान अधिकारी हे पद भरणे गरजेचे आहे. त्याकरिता जाहिरात देऊन रितसर उद्यान अधिकारी हया पदासाठी अधिकारी नेमणे.

**१५ ते १७. सौ. सुरेखा बंडू पाटील, यांजकडून :-**

(१५) प्र.क्र.१६ दिवागाव से.८ ऐरोली शिवशंकर प्लाझा जवळील वुड लॅण्ड शुज दुकानलगत स्वामीसमर्थ चौक सिग्नल येथे दुपदरी वाहनांची मुख्य रस्ता असल्यामुळे सर्व प्रकारच्या वाहनांची २४ तास वर्दळ असते, तेवढीच रहिवासी, विद्यार्थी, महिला यांची ये-जा चालू असते म्हणून सदर स्पॉट निरपराध नागरिकांचा बळी घेणारा घटक ठरत आहे. ट्राफीक पोलीस सतत कार्यरत नसतात तर सिग्नल यंत्रणा नेहमी चालू नसते, या सर्व पार्श्वभूमीवर निरपराध नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी त्या ठिकाणी त्वरीत आवश्यक अंतराचा ओव्हरब्रिज बांधून नागरिकांसाठी खुला करणे. (१६) प्र.क्र.१६ दिवागावामधील भुमीपुत्र व स्थानीक रहिवासी आपल्या उपजीवीकेसाठी मच्छीमारी करुन मच्छीविक्रेताचा धंदा जागा मिळेल त्या ठिकाणी बसून मच्छी विकायचा व्यवसाय करतात अपु-या सुविधामुळे तिथे त्यांना स्वच्छता राखता येत नाही. या पार्श्वभूमीवर सन २०१० मध्ये महासभेत सदर प्रभागातील से.९ दिवागाव येथे सर्वसुविधांसह "मच्छीमार्केट" आधुनिकरित्या बांधण्याबाबतचा ठराव मांडला होता, परंतु दोन वर्ष झाली त्यावर उपयुक्त कार्यवाही न झाल्याने माझ्या प्रभागातील भुमीपुत्र रहिवासी हवालदिल झाले आहेत, यास्तव सदर मागणीचा पुर्न:ठराव हया महासभेत मांडत आहे. त्यास त्वरीत मंजुरी देवून पूर्तता करावी. (१७) प्र. क्र.१६ दिवागाव मधील दिवागांव, से.८ , से.८अे, से.९, से.१० मधील सर्व नागरी वसाहती मधील मुख्य रस्ते, व वसाहतीमधील अंतर्गत वसाहती मधील सर्व फुटपाथ यांची युध्दपातळीवर दुरुस्ती करुन पेव्हर ब्लॉक बसविणे तसेच सर्व गटारांची दुरुस्ती करणे, त्यावर झाकणे टाकणे.

**१८ ते २०. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(१८) प्र.क्र.५ सिध्दीविनायक रहिवाशी संस्था, गणेशगल्ली साईसेवाचाळ, अष्टविनायक रहिवाशी चाळ, शिवशाही रहिवाशी चाळ-१, शिवशाही रहिवाशी चाळ-२, ॐ नम: शिवाय रहिवासी चाळ, हरि ॐ गुरुदत्त रहिवाशी सेवा संस्था, ओमकार रहिवाशी सेवा संस्था, ॐ शिवशंकर चाळ इलठणपाडा प्रभागातील संपूर्ण गटारे व पदपथ बनवून व ब्लॉक लावून मिळावे. (१९) प्र. क्र. ५ मधील इलठणपाडा येथे नागरी आरोग्य केंद्र, दिघा येथे कार्यरत असुन लवकरात लवकर इलठणपाडा येथे कार्यरत व्हावे. (२०) प्र.क्र.५ इलठणपाडा येथील जयभवानी चाळ, शिवशंकर चाळ, दुर्गामातामंदिर परिसर, शांतीदुत सेवा संघ, संपूर्ण पंढरीनगर भागातील सर्व ठिकाणची गटारे व पदपथ बनवून ब्लॉक लावणे.

**२१ व २२. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

(२१) प्र. क्र. ५१ वाशी मधील एलआयजी, एमआयजी सिडको निर्मित कंडोनियम आहेत. ३० ते ३५ वर्षापूर्वी सदर वास्तुंची निर्मिती करण्यात आली असून त्याठिकाणी एमएसईबी केबल टाकण्यात आलेली आहे. सदरच्या विद्युत केबलला ब-याच ठिकाणी जॉईंट मारल्यामुळे त्या केबलचा दर्जा कमी झाला आहे. त्यामुळे परिणामी वारंवार वीज बंद पडणे असे प्रकार सुरु आहेत. त्यामुळे एमएसईबी बरोबर बोलणी करुन केबल नव्याने टाकण्यात याव्यात किंवा सदर विद्युत वाहिन्या प्रभाग निधी किंवा नगरसेवक निधीतून शक्य असेल तर नियोजन करण्यात यावे.

(२२) प्र. क्र. ५१ मधील अनेक विभागात सेक्टरमधून प्रवेश करण्याचे विविध रस्ते आहेत. त्याठिकाणी चेन स्नॅचिंग तसेच इतर गंभीर गुन्हे घडत आहेत. या प्रकारांवर आळा बसविण्यासाठी विभागात प्रत्येक चौकात किंवा मुख्य रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. सीसीटीव्ही कॅमेरे हे नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधीतून बसविण्यास मान्यता द्यावी.

**२३ ते २५. सौ. राधा भुवन ठाकुर, यांजकडून :-**

(२३) प्र. क्र. ८६ शहाबाजगांव फणसपाडा येथील गटाराची सुधारणा व इंटरलॉक फूटपाथ बांधणे. (२४) प्र. क्र. ८६ से.१९/२० बेलापूर गांव येथील जैन बाबुलाल मुकेश गांधी व रमेश सोनटक्के यांच्या घराजवळील गटर व स्लॅबची दुरुस्ती व सुधारणा करणे. (२५) प्र. क्र. ८६ सी.बी.डी. बेलापूर से.१९/२० येथील कृष्णकमल बिल्डींग ते विध्या प्रसारक हायस्कूल पर्यंतच्या पदपथाची सुधारणा करणे.

**२६ ते २८. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

(२६) प्र.क्र. ८० मधील नेरुळ, सेक्टर १९अे, रायन इंटरनॅशनल स्कुल ते जवाहरनगर सोसायटीपर्यंतचा रस्ता करणे. (२७) प्र.क्र. ८० मधील नेरुळ, सेक्टर १९अे, भिमाशंकर सोसायटीमागील मोकळ्या जागेत उद्यानाद्धारे सुशोभिकरण करणे.

(२८) प्र. क्र. ८० मधील नेरुळ, सेक्टर १९अे, भिमाशंकर सोसायटी, रायन स्कुल पासुन निलसिध्दी सोसायटी पर्यंतचे ट्री बेल्टखालील उद्यान सुशोभित करणे.

**२९ ते ३१. सौ. शिल्पा प्रकाश मोरे, यांजकडून :-**

(२९) प्र. क्र. ४९ मधील डेफोडिल सोसायटी व लँडमार्क सोसायटी ते मेहुल सोसायटी व समाज मंदिर पर्यंतचा पदपथ नवीन हेव्ही डयुटी गटर टाकुन सुशोभित करणे.(३०) प्र.क्र. ४९ मधील इंदु सोसायटी ते सीटाडेल व सतलज ते H.D.F.C. दर्शन सोसायटी ते अरवती व कावेरी हया समोरासमोरील पदपथ नवीन तातडीने करुन देणे. (३१ ) प्र. क्र. ४९ मधील टेलिफोन एक्स्चेंज ते स्वीट सोसायटी व P.K.C. हॉस्पिटल ते पालवे गार्डन समोरासमोरील पदपथ तातडीने नवीन सुशोभित करुन देणे.

**३२. श्री. रमेश गोविंद शिंदे, यांजकडून :-**

मिनाताई ठाकरे वाचनालय येथे सुरक्षा रक्षकाची नेमणूक करणे.

**३३. सौ. माधुरी ज. सुतार, यांजकडून :-**

स्वर्गीय नानासाहेब धर्माधिकारी बहूउद्देशिय इमारत नादुरुस्त आहे. तरी डागडुगीची व्यवस्था करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ३१ जुलै २०१३.**

**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
बेलापूर भवन, ८ वा मजला,
सी.बी.डी., बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक ०२ ऑगस्ट २०१३.

**-: <u>सर्वसाधारण सभेची पुरवणी नोटीस</u> :-**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या **<u>बुधवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१३ रोजी दुपारी २.०० वाजता भरणा-या ऑगस्ट महिन्याच्या सर्वसाधारण मासिक सभेमध्ये पुढील जादा विषय क्र. ३४ ते ५१</u>** विचारात घेण्यासाठी प्रसृत करण्यात येत आहेत.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव(प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**३४ ते ३६. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(३४) पारसिक डोंगरावरील सायन पनवेल रस्त्याचे काम चालू झाल्याने खंडोरी देवीच्या मंदिराकडे जाणारा एम.आय.डी.सी. ने बांधलेला रस्ता विकास करुन पूर्ववत करणे.(३५) नवी मुंबई महानगरपालिका परिसरामध्ये काही भागात जमिनीची समपातळी नसल्यामुळे उंच ठिकाणी पडणा-या पावसाचे पाणी सखल भागाकडे जलद गतीने जाते व त्याबरोबर एखादी मलनि:स्सारण वाहिनी एखाद्या दिवशी तुंबली तर पडणा-या पावसाच्या पाण्याप्रमाणे वाहत जाते म्हणून प्रशासनातर्फे ठराविक ठिकाणच्या अंतरावर लोखंडी जाळ्या टाकून डकसिडी बनविणे.(३६) नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक नगरसेवकाला जनसंपर्क कार्यालय बांधुन देणे.

**३७ ते ३९. श्री. दशरथ सिताराम भगत, यांजकडून :-**

(३७) वाशी गांवातील आरक्षित असलेल्या भुखंडावर मच्छी मार्केटसह बहुउद्देशीय इमारत बांधणे. (३८) **प्र. क्र.** ५५ येथील इनऑरबिट, रघुलीला व सेंटर वन अशा प्रकारचे मॉल्स आणि तत्सम गर्दीच्या ठिकाणी हायमास्ट लावणे. (३९) सायन-पनवेल महामार्ग रुंदीकरणाचे काम चालू असून वाशीगांवातील ग्रामस्थ व वाशी, सेक्टर ४, ५ख ६, ७, ८, ९ व १० येथील नागरिकांच्या समवेत वाशीसह इतर विभागातील नागरिकांना मुंबई, नवी मुंबई, वाशी रेल्वे स्टेशन या परिसरातील प्रवास सुरक्षित व सुखकर होण्यासाठी खालील ठिकाणी १) वाशीगांव खाडी किनारा २) जनता मार्केट वाशी सेक्टर-७ ३) शिवशक्ती हॉटेल ४) स्वामी प्रणवानंद मार्गावरील सायन-पनवेल महामार्गालगत एम.एस.ई.बी. ट्रान्सफॉर्मर येथे भुयारी (अंडरपास)मार्ग निर्माण करावे.

**४० ते ४२. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(४०) आग्रोळी तलावाच्या ठिकाणी गणशेमुर्तींचे विसर्जन होत असुन या अनुषंगाने तलावाभोवती विद्युत दिवे व बसण्यासाठी बेंचेस असणे गरजेचे आहे. तरी गणेशोत्वापूर्वी सदर तलावाचे उर्वरीत कारंजे बसविण्याचे काम तसेच विद्युत दिवे व बेंचेसचे काम पूर्ण व्हावे. (४१) प्र.क्र. ८१ मधील सेक्टर २९, आग्रोळी बेलापूर येथे सिडकोने मैदानासाठी राखीव असलेला भूखंड क्षेत्रफळ सुमारे ५०० ते ७०० चौ.मी. असुन हा भूखंड मात्र अगदिच लहान आहे. गावातील, सार्वजनिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, सत्संग, लग्न समारंभ तसेच मैदानी खेळ स्पर्धा भरविणे ही सामाजिक गरज आहे. त्यामुळे सदरचा मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड रदद करुन बाजुलाच असलेल्या सेक्टर ३० व ३१ मध्ये सिडकोने भूखंड क्रमांक १४ हा मैदानासाठी आरक्षित केलेला आहे. सदर भूखंड आकाराने मोठा व मैदानी खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी योग्य असल्याने भूखंड क्रमांक १४ सेक्टर ३० व ३१ सी.बी.डी. बेलापूर हा भूखंड पालिकेने हस्तांतरीत करुन घेवून ग्रामस्थांना आणि येथील नागरिकांना मैदान उपलब्ध करुन दयावे. (४२) प्र.क्र. ८१ सी.बी.डी. सेक्टर १ येथे असलेल्या लोकशाहीर अन्नाभाऊ साठे उद्यान व सेक्टर ९ रोहाऊस येथील एकता उद्यानाची दुरावस्था झाली आहे. उद्यानातील सिमेंटचे बेंचेस तुटलेले आहेत. पाथवेच्या लादया तुटलेल्या आहेत. जंगली गवत वाढले आहे. तरी सदर उद्यानामध्ये शोभीवंत फूलझाडे लावून व्यवस्थित शेणखत घालून उद्यानातील दुरुस्ती व देखभाल करावी.

**४३ ते ४५. श्री. वैभव नारायण गायकवाड, यांजकडून :-**

(४३) प्र.क्र. ५३ वाशी सेक्टर -४ येथील अवरनेस्ट सोसायटी ते हरे कृष्णा सोसायटी पर्यंतच्या गटाराची दुरावस्था झालेली आहे. ब-याच ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. तरी संबंधित ठिकाणी नवीन पावसाळी गटार बनविणे. (४४) प्र.क्र. ५३ वाशी सेक्टर -४ येथील माऊली सोसायटी ते अष्टविनायक अपार्टमेंट लगतच्या गटाराची दुरावस्था झालेली आहे. ब-याच ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. तरी संबंधित ठिकाणी नवीन पावसाळी गटार बनविणे. (४५) प्र.क्र. ५३ वाशी सेक्टर -४ येथील सहवासी सोसायटी ते अजिंक्यतारा सोसायटी पर्यंतच्या गटाराची दुरावस्था झालेली आहे. ब-याच ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. तरी संबंधित ठिकाणी नवीन पावसाळी गटार बनविणे.

**४६. श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**

प्र.क्र. ०२ मध्ये गणपतीपाडा व रामनगर मुंकुंद पोलिस चौकी जवळ स्पीड ब्रेकर बांधणे.

**४७. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

प्र.क्र. २० येथील गोठीवली गावातील नारायण फर्निचरच्या लगतचा रस्ता चिंचेच्या झाडापर्यंत बनविणे.

**४८. श्री. विनित मोतीराम पालकर, यांजकडून :-**

सध्या नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज फाईलव्दारे (नस्ती तयार करुन) केले जात आहे. त्याऐवजी इ गव्हर्नस अंतर्गत सर्व विभागामधुन पेपर लेस काम करण्यात यावे असे प्रस्तावित आहे. यामुळे कुठल्याही विषयाची नस्ती तयार न करता महापालिकेची सर्व कामे ऑनलाईन करण्यात यावे. उदा. एखादया विषयाची नस्ती तयार न करता त्या संदर्भातील टिप्पणी कनिष्ठ अभियंता तयार करुन संगणक प्रणालीद्वारे उप अभियंता यांचेकडे पाठवतील. उप अभियंता सदर प्रस्ताव अंदाजपत्रकानुसार तपासुन आपले अभिप्राय देवून कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठवतील. कार्यकारी अभियंता सदर प्रस्ताव तपासुन आपले उचित अभिप्राय देऊन शहर अभियंता/अति. शहर अभियंता/सह. शहर अभियंता यांचेकडे संगणक प्रणालीद्वारे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित करतील. शहर अभियंता/ अति. शहर अभियंता/सह. शहर अभियंता हे सदरचे प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे संगणक प्रणालीद्वारे सादर करतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे मा.आयुक्त संगणक प्रणालीद्वारे प्रस्ताव अभिप्रायासाठी पाठवतील. यासर्व प्रक्रियेमध्ये प्रत्येक अधिकारी/कर्मचारी डिजिटल सिग्नेचरचा वापर करतील ऑन लाईन कामकाजाकरिता डिजीटल सिग्नेचर आवश्यक असुन अशा प्रकारे डिजिटल सिग्नेचरद्वारे पाठविलेले अभिलेख IT ॲक्ट २००० नुसार वैध ठरतात. मी या प्रस्तावाद्वारे असे सुचित करतो कि, वर दिलेल्या अभियांत्रिकी विभागाचे उदाहरणानुसार महानगरपालिकेतील इतर सर्व विभागांचे कामकाज वरील कार्यपध्दतीनुसार संगणक प्रणालीद्वारे व डिजिटल सिग्नेचरचा वापर करुन करणे.

**४९ ते ५१.श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

(४९) नवी मुंबई महानगरपालिका नेरुळ, येथील होणा-या रुग्णालयात मनोरुग्ण विभाग (Mental Disease Department), मनोदैन्य(Depression), स्मृतीभ्रंश (Dementia) रुग्णांकरिता नियमित बाहयरुग्ण विभाग (OPD) चालु करावा. (५०) केरळ राज्याच्या धर्तीवर व पुणे येथे सिपलाच्या माध्यमातून चालवल्या जाणा-या जीर्ण जरा रुग्णांकरिता महानगरपालिकेच्या रुग्णालयात दु:ख परिहारक कक्ष ( Palliative care ward) तसा एक तरी कक्ष चालु करावा. (५१) नवी मुंबई महानगरपालिकेने गरीब ज्येष्ठांसाठी एक वृध्दाश्रम व एक विश्रामाश्रम (Respite home) चालु करावा.

## <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

महापालिका सचिव कार्यालय,
बेलापूर भवन, ८ वा मजला,
सी.बी.डी., बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक ०५ ऑगस्ट २०१३.

**-: <u>सर्वसाधारण सभेची पुरवणी नोटीस</u> :-**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या **<u>बुधवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१३ रोजी दुपारी २.०० वाजता भरणा-या ऑगस्ट महिन्याच्या सर्वसाधारण मासिक सभेमध्ये पुढील जादा विषय क्र. ५२ ते ५३</u>** विचारात घेण्यासाठी प्रसृत करण्यात येत आहेत.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव(प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

---------------------------------------------------------------------

**५२. श्री. संपत आनंदा शेवाळे, यांजकडून :-**
नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध टाईपच्या धोकादायक इमारतींमधील घरांचे स्लॅब व प्लास्टर कोसळण्याच्या घटना गेल्या कित्येक वर्षापासून वारंवार घडत आहेत. सुदैवाने आतापर्यंत झालेल्या अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये जिवीतहानी झाली नसली तरी भविष्यात होण्याचा धोका संभवण्याची शक्यता व्यक्त करत पावसाळा सुरु असल्याने हा धोका अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. सिडको, हौसिंग सोसायट्या तसेच खाजगी विकासकाकडून बांधलेल्या इमारतींपैकी महापालिका कार्यक्षेत्रातील ज्या इमारती धोकादायक आहेत त्या सर्व जीर्ण इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे.

**५३. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**
प्र.क्र. २० अंतर्गत शाळा क्र. ४६ गोठिवली गांव शाळेच्या २ इमारती बांधून १ वर्ष झाले. तरी शाळेवरती साफसफाई कर्मचारी व सुरक्षारक्षक नेमणूक करावी.